वेचक



## महाड नगर परिषदेच्या सभागृहाला माजी आ. स्व. माणिकराव जगताप यांचे नाव

**महाड :** महाड नगर परिषदेच्या सभागृहाला माजी आमदार माणिकराव जगताप यांचे नाव द्यावे असा एकमुखाने ठराव मागील कार्यकारिणीत संपत करण्यात आला होता. मात्र त्यावर पालिका प्रशासन यांचेकडून कोणतीच कार्यवाही न केल्याने सोमवारी महाड नगरपरिषदेतील राष्ट्रवादी कॉंग्रेस (अजित पवार) व भाजपच्या गटाने स्वखर्चाने बोर्ड तयार करून सभागृहाचे माजी आ.स्व.माणिकराव जगताप असे नामकरण झाल्याची घोषणा केली. महाड नगरपरिषदेच्या सभागृहाने हा ठराव ५ वर्षांपूर्वीच संमत केला असल्याने फक्त नामफलकाचा खर्च कुणी करायचा एवढाच मुद्दा असल्याने आम्ही सदर खर्च करून नामफलकाची पाटी सभागृहाला लावून आजपासून या सभागृहाचे माजी आ.स्व.माणिकराव जगताप असे नामकरण झाले अशी घोषणा केली आहे त्याला कुणाची हरकत असण्याचे कारण नाही असे महाडचे उपनगराध्यक्ष संदीप जाधव यांनी स्पष्ट केले. या नामकरण सोहळ्याला शिवसेनेच्या सदस्यांनी उपस्थित राहावे अशी विनंती आम्ही केली होती मात्र त्यांच्याकडून कोणताच प्रतिसाद मिळाला नाही असे त्यांनी सांगितले.



## तळा, माणगावातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप

**तळा :** हरीओम चॅरिटेबल असोसिएशन मुंबई, वालीबेन जेठालाल छेडा परिवार व सामाजिक कार्यकर्ते कृष्णा महाडिक यांच्या सहकार्याने तळा व माणगाव तालुक्यातील १५ शाळांमधील १०५० विद्यार्थ्यांना सॅंडल व शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. पूर्वी आर्थिक परिस्थिती बेताची असताना शिक्षण घेणे अत्यंत कठीण होते. मात्र आजघडीला समाजातील दानशूर व्यक्ती व सामाजिक कार्यकर्ते यांच्यामुळे गरीबातील गरीब विद्यार्थ्यांसाठी देखील शिक्षणासाठी सर्व प्रकारच्या सोयी सुविधा उपलब्ध झाल्या आहेत. तळा व माणगाव तालुक्यातील विविध शाळांमध्ये शिकत असलेल्या गोरगरीब आदिवासी मुलांना दोन ते तीन किलोमीटर अंतरावरून पायी चालत शाळेत यावे लागते. अशावेळी त्यांना चालण्यासाठी पायात सॅंडलची नितांत आवश्यकता असते. त्यांची ही गरज लक्षात घेऊन सामाजिक कार्यकर्ते कृष्णा महाडिक यांच्या प्रयत्नाने वालीबेन जेठालाल छेडा यांच्यामार्फत तळा व माणगाव तालुक्यातील १५ शाळांमधील १०५० विद्यार्थ्यांना सॅंडल व शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.

## जिल्हा रुग्णालयात 'लोकसंख्या स्थिरता सप्ताह'

**अलिबाग :** देशाची आणि जगाची झपाट्याने वाढणारी लोकसंख्या ही सध्याच्या काळातील अत्यंत गंभीर समस्या बनली आहे. या वाढत्या लोकसंख्येमुळे उपलब्ध नैसर्गिक संसाधने, रोजगार, शिक्षण आणि आरोग्य व्यवस्था यांवर प्रचंड ताण निर्माण होत असल्याने समाजात कुटुंब नियोजनाबाबत व्यापक जनजागृती करणे ही काळाची गरज आहे, असे प्रतिपादन जिल्हा रुग्णालयातील निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. किरण शिंदे यांनी केले. जिल्हा रुग्णालय रायगड आणि रायगड जिल्हा परिषद आरोग्य विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने अलिबाग येथील जिल्हा रुग्णालयात ११ ते १८ जुलैदरम्यान 'लोकसंख्या स्थिरता सप्ताह' साजरा करण्यात आला. या विशेष सप्ताहाच्या उद्घाटनपर सोहळ्याप्रसंगी निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. किरण शिंदे बोलत होते.

# आठवडाभराच्या विश्रांतीनंतर जिल्ह्यात पावसाचे पुनरागमन

### शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण; शेतीच्या कामांना वेग

◆ **अलिबाग (प्रतिनिधी) :**



आठ दिवसांच्या विश्रांतीनंतर रायगड जिल्ह्यात पुन्हा एकदा पावसाने रविवारपासून पुन्हा दमदार हजेरी लावल्याने शेतीच्या कामांना आता वेग येणार असून, शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.

मागील तीन-चार दिवसांपासून जिल्ह्यात ढगाळ वातावरण होते. अधूनमधून पावसाची एखादी सर कोसळत होती. मात्र रविवारी अलिबाग, पेण, पनवेल, उरण, रोहा, माणगाव, महाड, पोलादपूर, म्हसळा, श्रीवर्धन, मुरुड, तळा, सुधागड, कर्जत आणि खालापूर तालुक्यांसह बहुतांश भागात मध्यम ते जोरदार पावसाच्या सरी कोसळल्या. या पावसामुळे वातावरणात परत एकदा गारवा निर्माण झाला आहे.

गेल्या आठ दिवसांपासून पावसाने दडी मारल्याने भातलागवडीनंतरची अनेक शेतीकामे खोळंबली होती. पाण्याअभावी काही ठिकाणी भात रोपांच्या वाढीवर परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात होती. मात्र, नव्याने झालेल्या पावसामुळे भातशेतीला आवश्यक ओलावा मिळाला असून, तणनियंत्रण, खत व्यवस्थापन आणि शेतीकामांना पुन्हा वेग येणार आहे. यावर्षी जुलै महिन्याच्या पहिल्या आठवड्यात रायगड जिल्ह्यात अतिवृष्टी झाली होती. मुसळधार पावसामुळे अनेक ठिकाणी भात रोपवाटिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते. काही भागांत शेती पाण्याखाली गेली होती, तर शेतकऱ्यांना नव्याने रोपवाटिका तयार करण्याची वेळ आली होती. त्यानंतर पावसाने अचानक विश्रांती घेतल्याने शेतीचे नियोजन विस्कळीत झाले होते. आता पुन्हा पावसाने दमदार पुनरागमन केल्याने खरीप हंगामाला नवसंजीवनी मिळाली आहे. हवामान विभागाने पुढील काही दिवस जिल्ह्यात हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस सुरू राहण्याची शक्यता वर्तवली असून, त्यामुळे खरीप पिकांना फायदा होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

**खबरदारी घेण्याचे आवाहन**

अतिवृष्टीचा धोका लक्षात शेतकऱ्यांनी आवश्यकती खबरदारी घ्यावी, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे. पावसाच्या पुनरागमनामुळे जिल्ह्यातील जलसाठ्यांमध्येही वाढ होणार असून, ग्रामीण भागात समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# श्रीवर्धन नगरपालिकेला ६ कोटींचा निधी मंजूर

### खा. तटकरेंच्या पाठपुराव्याला यश

◆ **श्रीवर्धन (वार्ताहर) :**



खासदार सुनील तटकरे, आमदार अदिती तटकरे आणि विधानपरिषद आमदार अनिकेत तटकरे यांच्या पाठपुराव्यामुळे श्रीवर्धन नगरपालिकेला "नगरपरिषदांना वैशिष्ट्यपूर्ण कामांसाठी विशेष अनुदान योजना" अंतर्गत तब्बल ३ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. तसेच रस्ता अनुदानातून ३ कोटी असा एकूण सहा कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला आहे.

या योजनेअंतर्गत नगरपालिका क्षेत्रातील विविध रस्त्यांच्या कॉंक्रिटीकरणासह विकासकामांना गती मिळणार असून, बहुउद्देशीय सभागृह सुद्धा बांधण्यात येणार आहे. यामुळे शहराच्या सर्वांगीण विकासाला मोठी चालना मिळणार आहे. रस्ता अनुदान निधीतून दाबक पाखाडी येथील रस्ता, सावित्रीबाई फुले चौक ते मठाचा गवंड रस्ता, भैरवनाथ पाखाडी रस्ता, पार नाका ते जिवनेश्वर मंदिरापर्यंतचा रस्ता, काशिनाथ बापू चोगले चौक ते जीवना पुलापर्यंतचा रस्ता, घोली मोहल्ला येथे श्री इर्शाद कादरी ते पुलपार मशिदीपर्यंतचा रस्ता, मोगल मशीद ते बागवान मशीद रस्ता, खालचा जीवना येथील रस्ता, सुबोध नागवेकर ते सचिन भुसाणे यांच्या घरापर्यंत रस्ता कॉंक्रिटीकरण, रोहिदास नगर, सिद्धार्थ नगर, हरीनवाडा तसेच वरचा जीवना येथील रस्त्यांचे कॉंक्रिटीकरण अशा महत्त्वाच्या कामांचा समावेश करण्यात आला आहे.

विशेष म्हणजे, नगरपालिका हद्दीतील सर्वच प्रभागांमध्ये या निधीचा समतोल पद्धतीने वापर करण्यात येणार असल्याने शहरातील अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या रस्त्यांच्या समस्या मार्गी लागण्यास मदत होणार आहे. दर्जेदार रस्ते उपलब्ध झाल्यामुळे नागरिकांचा प्रवास अधिक सुरक्षित आणि सुलभ होणार असून, श्रीवर्धन शहराच्या सौंदर्यातही लक्षणीय भर पडणार आहे.

## मांडवा जेट्टीवरील अनधिकृत बारवर हातोडा पडणार ?

◆ **अलिबाग (प्रतिनिधी) :**

रायगड जिल्ह्यातील प्रसिद्ध पर्यटनस्थळ असलेल्या अलिबाग तालुक्यातील मांडवा जेट्टी येथील अनधिकृत शॉपिंग मॉल, रेस्टॉरंट आणि कथित बेकायदेशीर बारवर अखेर प्रशासनाने कडक पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. अलिबागचे उपविभागीय अधिकारी मुकेश चव्हाण यांनी या संपूर्ण जागेची संयुक्त स्थळपाहणी, मोजमाप आणि व्हिडिओ शूटींगसह पंचनामा करण्याचे आदेश दिले होते.

संयुक्त स्थळपाहणीमध्ये मंडळ अधिकारी, तलाठी, नगरविकास विभागाचे प्रतिनिधी व तालुका भूमी अधीक्षक व तक्रारदार संजय गंगाराम सावंत यांचा समावेश असल्याचे प्रांत यांच्या आदेशात म्हटले आहे. त्यानुसार ही स्थळपाहणी पूर्ण झाली असून, येत्या चार ते पाच दिवसांत अहवाल वरिष्ठांकडे पाठवणार असल्याचे तक्रारदार सावंत यांना सांगण्यात आले आहे. या कारवाईमुळे किनारी नियंत्रण क्षेत्र नियमांचे उल्लंघन करणाऱ्या भूमाफियांमध्ये प्रचंड खळबळ उडाली आहे.




मांडवा जेट्टी परिसरात बीच बॉक्स नावाचा अनधिकृत शॉपिंग मॉल, रेस्टॉरंट आणि बार उभारण्यात आले आहेत. सामाजिक कार्यकर्ते संजय सावंत यांनी याबाबत रायगडचे जिल्हाधिकारी आणि महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड यांच्याकडे सातत्याने तक्रारी दाखल केल्या होत्या. महाराष्ट्र कोस्टल झोन मॅनेजमेंट ऑथॉरिटीच्या २८ जुलै २०१७ रोजी झालेल्या बैठकीत, पर्यावरण संरक्षण कायदा १९८६ अंतर्गत हे अनधिकृत स्टॉल्स व बांधकामे तत्काळ तोडून टाकण्याचे स्पष्ट आदेश जिल्हाधिकारी व मेरीटाईम बोर्डाला दिले गेले होते. मात्र, गेल्या आठ वर्षांत कोणतीही ठोस कारवाई झाली नाही, उलट या संवेदनशील सीआरझेड क्षेत्रात अनधिकृतपणे बार सुरू झाल्याने स्थानिक नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत होता.

## जंतर-मंतरवरील आंदोलनाला कर्जतमध्ये पाठिंबा

◆ **कर्जत (वार्ताहर) :**

दिल्लीतील जंतर-मंतर येथे सुरू असलेल्या नीट परीक्षेसंदर्भातील आंदोलनाला पाठिंबा दर्शवत कर्जत तालुक्यातील विद्यार्थी, पालक आणि जागरूक नागरिकांनी सोमवारी निदर्शने करत तहसील कार्यालयावर मोर्चा काढला. त्यानंतर तीव्र भावना व्यक्त करीत तहसीलदारांना निवेदन देण्यात आले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकापासून तहसील कार्यालयापर्यंत घोषणाबाजी करत मोर्चा काढण्यात आला. यावेळी ॲड.कैलास मोरे, माजी उपनगराध्यक्ष उमेश गायकवाड, नगरसेवक राजाभाऊ कोठारी, सचिन भालेराव, जितरत्न जाधव, यांच्यासह अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

तहसीलदार धनंजय जाधव यांना दिलेल्या निवेदनात नीट परीक्षेतील कथित गैर व्यवहाराची सखोल चौकशी करावी. तसेच केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारून राजीनामा द्यावा अशा प्रमुख मागण्या करण्यात आल्या.

# अलिबागजवळ १८९८ मधील ब्रिटिशकालीन शिवमंदिराचा शिलालेख सापडला!

### महाडच्या संशोधकाने शोधला इतिहासाचा अनमोल ठेवा

◆ **महाड (वार्ताहर) :**



रायगड जिल्ह्यातील अलिबाग जवळील कुसुंबळे येथील प्राचीन शिवमंदिराच्या जोत्यावर कोरलेला ब्रिटिशकालीन शिलालेख इतिहास संशोधनाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा ठरत आहे. शके १८२० (इ.स.१८९८) मधील हा चार ओळींचा शिलालेख कोकण इतिहास परिषदेचे रायगड जिल्हाध्यक्ष महाड येथील प्रा. डॉ. अंजय धनावडे यांनी शोधून त्याचे वाचन केले आहे. या शिलालेखामुळे कोकणातील शैव परंपरा, मंदिर व्यवस्थापन आणि पुरी संप्रदायाच्या कार्याचा एक महत्त्वपूर्ण ऐतिहासिक दस्तऐवज प्रथमच प्रकाशात आला आहे.

ब्रिटिश राजवटीच्या काळात अलिबाग हे जिल्ह्याचे प्रशासकीय केंद्र असतानाही ग्रामीण भागातील धार्मिक संस्था, मठपरंपरा आणि मंदिर व्यवस्थापन सक्रिय असल्याचा हा दुर्मीळ अभिलेखीय पुरावा मानला जात आहे. शिलालेखातील मजकुरानुसार – "बुधपुरी, समशेरपुरी, शंकरपुरी व चिदापुरी चे मंदिर होते. त्याचा जीर्णोद्धार नातू देऊपुरी, गुरु मंगळपुरी." असा उल्लेख आढळतो. तसेच "गौरशिवचे पु. पांडू बामणा." अशी नोंदही कोरलेली आहे. शेवटी "शके १८२०, विलंबी नाम संवत्सरे" अशी स्पष्ट कालनोंद असल्याने मंदिराचा जीर्णोद्धार इ.स.१८९८ मध्ये झाल्याचे सिद्ध होते.

कोकणातील पुरी परंपरेचा इतिहास शिवकालापर्यंत मागे जात असल्याचे विविध ऐतिहासिक साधनांवरून दिसून येते. छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात निश्चलपुरी यांचा उल्लेख इतिहासात आढळतो.

प्रा. डॉ. धनावडे यांनी सांगितले की, येथे उल्लेख झालेली बुधपुरी, समशेरपुरी, शंकरपुरी, चिदापुरी, देऊपुरी आणि मंगळपुरी ही नावे दशनामी गोसावी परंपरेतील "पुरी" शाखेशी संबंधित असल्याची दाट शक्यता आहे. त्यामुळे हा शिलालेख कोकणातील पुरी संप्रदायाचे अस्तित्व, त्यांची गुरु-शिष्य परंपरा अधोरेखित करणारा महत्त्वपूर्ण ऐतिहासिक दस्तऐवज ठरतो.


# उज्जीवन स्मॉल फायनांस बँक

UJJIVAN

**नोंदणीकृत कार्यालय:** ग्रेप गार्डन, क्र. २७, ३ रा "ए" क्रॉस, १८ वा मेन, ६ वा ब्लॉक, कोरामंगलम बेंगळूरू – ५६००९५, कर्नाटक
**क्षेत्रिय कार्यालय:** ७ वा मजला, अलमोन्टे आयटी पार्क, सर्वे क्र. ८ खराडी-मुंढवा बायपास, गाव खराडी, पुणे ४११०१४.

**जाहीर लिलाव सूचना**

**सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) नियमावली २००२ च्या नियम ८(६) आणि ९ सह वाचल्या जाणाऱ्या सिक्युरीटायझेशन अँड रिकंस्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शियल अॅसेटस अँड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट, (सरफेसी कायदा) २००२ अंतर्गत विक्रीसाठी जाहीर सूचना**

उज्जीवन स्मॉल फायनांस बँक लि. चे अधिकृत अधिकारी म्हणून अधोस्वाक्षरीने, सरफेसी कायदा च्या कलम १३ (४) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून खालील मालमत्तेचा ताबा घेतला आहे. विशेषतः कर्जदारांना आणि सामान्य जनतेला सूचित करण्यात येते की बँकेच्या थकबाकीच्या वसुलीसाठी खाली नमूद केलेल्या खात्यातील तारण मालमत्तेचा सार्वजनिक लिलाव **"जसे आहे जेथे आहे"** आणि **"जसे आहे तसे आहे तत्वावर"** खाली नमूद दिनांकाला करण्यात येईल.

| अनु. क्र. | कर्ज खाते क्र. / शाखा | कर्जदार/ सह-कर्जदार/ हमीदार/ गहाणदारांचे नाव | १३ (२) सूचना दिनांक/ थकीत देणी (रु. मध्ये) अनुसार | ताब्याचा दिनांक | राखीव मूल्य आयएनआर मध्ये/ इरठे आयएनआर मध्ये |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 44112101300004 68 / 4411- कोपरखैरणे | **१.सिद्धार्थ गौतम गवई, २. नेहा सिद्धार्थ गवई :** दोघे येथे देखीलः घर क्र. २५८ पंचशील नगर, सेक्टर १७, पनवेल रायगड, महाराष्ट्र ४१०२०६. अनु. क्र. १ येथे देखीलः टिव्हीएस सप्लाय चेन सोल्युशन्स लि., बिल्डींग क्र. ए-१९, गाळा क्र. ए-१९-१२, १२, १४ हरिहर कॉम्प्लेक्स, माणकोली नाका, भिवंडी, ठाणे, महाराष्ट्र ४२१२०२. अनु. क्र. २ येथे देखीलः शुभांगी एस. म्हात्रे, नील इम्प्रस सीएचएस सदनिका ३०१, सेक्टर ५, सिडको ऑफिस जवळ, एचडीएफसी सर्कल, पनवेल, महाराष्ट्र ४१०२०६ | २९.०५.२०२४/ २८.०५.२०२४ अनुसार रु. १०२७९५१.०७ | २७.०३.२०२६ | रु. १०५९०००/- रु. १०५९००/- |

**स्थावर मालमत्तेचे वर्णन:** गाव चिपले बोनशेत, तालुका पनवेल, जिल्हा रायगड, महाराष्ट्र येथे वसलेल्या साधारण पणे ४३५६ चौ. फू. क्षेत्रफळ आकाराच्या जमिनीचा धारण केलेला मिळकत क्र. ९९२ डी वर बांधण्यात आलेल्या "सेव्हन सिटी" म्हणून ज्ञात इमारतीच्या विंग डी च्या तळ मजल्यावरील साधारण पणे २७९ चौ. फू. चटई क्षेत्रफळ असलेली सदनिका क्र. ००२ चा सर्व खंड आणि भूखंड. ज्याची मालकी सिद्धार्थ गौतम गवई ह्यांची आहे.

मालमत्ता (मत्तां) च्या पाहणीचा दिनांक आणि वेळ :: २७-०७-२०२६ आणि १९-०८-२०२६ रोजी स. ११ वा. ते सायं. ४ वा. दरम्यान
बोली आणि इरठेच्या सादरीकरणासाठी दिनांक :: २४-०८-२०२६ रोजी स. ११:०० वा ते सायं. ५:०० वा. दरम्यान
लिलावाचा दिनांक आणि वेळ :: २५-०८-२०२६ रोजी दु. २:०० वा पासून सायं. ५:०० वा. पर्यंत
**इसारा रक्कम ठेव (इरठे) आयएनआर मध्ये ("उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक लि." च्या नावे डिमांड ड्राफ्टद्वारे भरावेत),**

बोली सादर करण्याचे आणि लिलावाचे ठिकाणः उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक लि. नानक अपार्टमेंट हॉटेल झायका समोर, खडकपाडा सर्कल जवळ, कल्याण मुरबाड रोड, बायले नगर, कल्याण ४२१३०१. **संपर्क तपशील: अमोल जोशी: ७९००१२७५५५, चंद्रमोहन चौधरी : ८१०८८३८२८६)**

**अटी आणि शर्ती :** ई- लिलाव "जसे आहे जेथे आहे" आणि "जसे आहे तसे आहे तत्वावर" करण्यात येणार आहे.

1. प्राधिकृत अधिकारी यांच्या माहितीनुसार कोणत्याही मालमत्तेवर कोणत्याही स्वरूपाचा भार नाही. मात्र मालमत्तेचे हक्क, हक्क संबंध तसेच त्यावरील भार आदी यांची माहिती तसेच मालमत्तेच्या संदर्भातील दावे, हक्क देणी आदी यांची माहिती जाणून घेण्यासाठी इच्छूक खरेदीदार यांनी मालमत्तेच्या संदर्भात स्वतंत्र चौकशी बोली सादर करण्याच्या पूर्वी करावी. इ लिलावाची जाहिरात म्हणजे वचन किंवा बँकेचे प्रतिनिधित्व नाही आणि असणार नाही. मालमत्ता ही सध्याच्या आणि भविष्यातील भारांसह विक्री केली जात आहे जे बँकेला ज्ञात आहेत किंवा ज्ञात नाहीत. प्राधिकृत अधिकारी / संरक्षित धनको हे तृतीय पक्षकार यांचे हक्क, हक्क संबंध दावे अथवा देणी यांना जबाबदार असणार नाहीत.
2. बोली सादर करण्याच्या आधी मालमत्तेची चौकशी करणे आणि पाहणी करणे ही इच्छूक खरेदीदार यांची जबाबदारी आहे. लिलावासाठी ठेवण्यात आलेल्या मालमत्तांची पाहणी इच्छूक खरेदीदार यांना प्रत्येक मालमत्तेसमोर वरील प्रमाणे नमूद केलेल्या वेळेनुसार करता येईल.
3. इच्छूक खरेदीदार यांनी आपली बोली निम्नस्वाक्षरीकार यांच्याकडे वरील प्रमाणे नमूद केलेल्या लिलावाच्या तारखेच्या आधी एक दिवस सादर करणे आवश्यक आहे.
4. ई लिलाव उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक मान्यताप्राप्त ई-लिलाव सेवा पुरवठादार **मे. सी 1 इंडिया प्रायव्हेट लिमिटेड** यांच्याद्वारे करण्यात येईल. संपर्क व्यक्तीः **प्रभाकरन एम - (मो क्र ७४१८२८१७०९).** इच्छूक बोलीदारांना सल्ला देण्यात येत आहे की त्यांनी **https://www.bankeauctions.com किंवा https://www.ujjivansfb.in/e-auctions ला** भेट देऊन मालमत्तेचा तपशील जाणून घ्यावा आणि बोली प्रक्रियेत सहभाग घेण्यासाठी आपली नावे नोंदविण्यासाठी **https://www.bankeauctions.com ला** भेट द्यावी आणि युजर आयडी आणि पासवर्ड प्राप्त करून घ्यावा. इच्छूक खरेदीदार यांना ई लिलावाच्या संदर्भात ऑनलाईन प्रशिक्षण सेवा पुरवठादार मेसर्स सी १ इंडिया प्रायव्हेट लिमिटेड, हेल्प लाईन क्रमांक ७२९११९१८८२४, २५, २६ इ मेल आयडी **support@bankeauctions.com, लिलाव पोर्टल https://www.bankeauctions.com** येथे देण्यात येईल.
5. मालमत्तेची विक्री सर्वाधिक बोली सादर करणाऱ्याला करण्यात येईल मात्र ते संरक्षित धनको म्हणजेच उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक लिमिटेड यांच्या मान्यतेस अधीन असेल. मात्र निम्नस्वाक्षरीकर यांना आवश्यकता भासल्यास इंटर से बिडिंग प्रक्रिया घेण्याचा निर्णय घेण्याची मुभा आहे. बोली स्वीकारण्याचा तसेच कोणतेही कारण न देता कोणतीही बोली / निविदा नाकारण्याचा अधिकार निम्नस्वाक्षरीकार याना आहे.
6. यशस्वी बोलीदार यांचे ईएमडी विक्री किमतीचा भाग म्हणून राखून ठेवले जाईल आणि अयशस्वी बोलीदार यांचे ईएमडी परत देण्यात येईल. ईएमडी रकमेवर कोणत्याही स्वरूपाचे व्याज दिले जाणार नाही. यशस्वी बोलीवर यांना विक्री किमतीच्या २५ % रक्कम ईएमडी ऍडजेस्ट करून प्राधिकृत अधिकारी यांच्याकडून बोली स्वीकारली गेल्यानंतर २४ तासांत अदा करणे आवश्यक आहे. आणि विक्री किमतीच्या उर्वरित ७५% रक्कम विक्री निश्चित झाल्याच्या १५ दिवसात किंवा परस्पर सहमतीने ठरलेल्या दिवशी जो तीन महिन्यांपेक्षा अधिक असणार नाही, त्या दिवशी प्राधिकृत अधिकारी यांनी मान्य केल्यानुसार अदा करणे आवश्यक आहे. यशस्वी बोलीदार यांनी वरील प्रमाणे नमूद केलेल्या अनुसार रक्कम अदा केली नाही या आधीच भरणा केलेली रक्कम जप्त होण्यास पात्र असेल आणि मालमत्ता पुन्हा इ लिलावाद्वारे विक्रीसाठी ठेवण्यात येईल आणि थकीत खरेदीदार यांचा मालमत्तेवर कोणताही अधिकार किंवा दावा करता येणार नाही.
7. सदर प्रसिद्धी सूचना अमलबजावणी होणाऱ्या मुद्यांना अनुसरून आहे.
8. बोलीदारांनी आपल्या हितासाठी शेवटच्या क्षणी बोली लावणे टाळावे कारण खंडित वीज / खंडित इंटरनेट आदींसाठी उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक किंवा सेवा पुरवठादार जबाबदार असणार नाहीत अशा घटना टाळण्यासाठी बोलीदारांना आवाहन करण्यात येते आहे की त्यांनी पॉवर सप्लाय बॅक अप आदींची सोय करून ठेवावी. ज्यायोगे त्यांना लिलाव प्रक्रियेत विना अडथळा सहभाग घेता येणे शक्य होईल.

ही सूचना वरील प्रमाणे नमूद केलेले कर्जदार / हमीदार / तारण दार यांना तारण ठेवलेल्या मालमत्तेच्या विक्रीच्या वेळापत्रकाची सूचना आहे.

**ठिकाण: महाराष्ट्र, दिनांक : २१.०७.२०२६**
**सही/- प्राधिकृत अधिकारी, उज्जीवन स्मॉल फायनांस बँक**


## शेकापचे भाऊशेठ पाटील भाजपात

**पनवेल (वार्ताहर) :** पनवेल तालुक्यात शेतकरी कामगार पक्षाला पुन्हा एकदा मोठा राजकीय धक्का बसला आहे. तालुक्यातील खानाव येथील शेकापचे ज्येष्ठ कार्यकर्ते आणि खंदे समर्थक भाऊशेठ पाटील यांनी आपल्या संपूर्ण कुटुंबीयांसह आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली भारतीय जनता पार्टीचे कमळ हाती घेतले आहे.

श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सभागृहात हा दिमाखदार पक्षप्रवेश सोहळा संपन्न झाला. यावेळी भाजपचे महाराष्ट्र प्रदेश चिटणीस आमदार प्रशांत ठाकूर यांनी भाऊशेठ पाटील यांच्यासह भाजपमध्ये दाखल झालेल्या सर्व कार्यकर्त्यांचे पक्षात अगत्याने स्वागत केले. भाऊशेठ पाटील यांनी जो विश्वास ठेवून भाजपमध्ये प्रवेश केला आहे, तो विश्वास पक्षसंघटनेच्या माध्यमातून पूर्णपणे सार्थ ठरवला जाईल, अशी ग्वाही आमदार प्रशांत ठाकूर यांनी यावेळी दिली. या पक्षप्रवेशामुळे खानाव परिसरासह संपूर्ण पनवेल तालुक्यात भाजपची ताकद आणखी मजबूत झाली आहे.

महाराष्ट्र वाहतूक संघटनेचे अध्यक्ष प्रभुदास भोईर यांच्या मार्गदर्शनाखाली पाटील कुटुंबीयांनी भाजपमध्ये पक्षप्रवेश केला. यावेळी खानावचे माजी सरपंच दत्तात्रेय पाटील, माजी उपसरपंच ताईबाई पाटील, माजी ग्रामपंचात सदस्य जयश्री पाटील, तंटामुक्तीचे माजी अध्यक्ष हरिश्चंद्र पाटील यांच्यासह पाटील कुटुंबीयांनी भारतीय जनता पार्टीमध्ये जाहीर पक्षप्रवेश केला.

## निजामपूर विभागात होऊ घातलेल्या बल्क ड्रग पार्कला भूमिपुत्रांचा विरोध

◆ **माणगाव (वार्ताहर) :**

स्थानिक भूमिपुत्रांना अंधारात ठेवून शासनाने डीएमआयसीच्या माध्यमातून माणगाव रोहा तालुक्यातील पाच ग्रामपंचायती अंतर्गत सुमारे २०/२५ गावे बाधित होतील अशा प्रकारचा बल्क ड्रग पार्क, अर्थात केमिकलयुक्त हानिकारक कंपन्या माथी मारल्याचे समजताच येथील स्थानिक भूमिपुत्रांनी एकत्र येऊन शासनाच्या या धोरणाला कडाडून विरोध असल्याचा एकमुखी निर्णय घोषित करताना कोणत्याही परिस्थितीत बल्क ड्रग पार्क होऊ देणार नाही असा डीएमआयसीसह शासनालाच निर्वाणीचा इशारा दिला.

शासनाच्या डीएमआयसी अंतर्गत बल्क ड्रग पार्क प्रकल्पाला विरोध करण्यासाठी माणगाव पंचायत समितीचे विद्यमान सभापती विलास शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली भाले येथील हनुमान मंदिरात घेण्यात आलेल्या सभेत भाले, पानसई, रातवड-भुवन पहूर जामगाव ग्रामपंचायत अंतर्गत बल्क ड्रग पार्क अर्थात केमिकलयुक्त हानिकारक कंपन्यांमुळे बाधित होणाऱ्या सुमारे २०/२५ गाववाड्यांसह निजामपूर, कडापे ग्रामपंचायत अंतर्गत गावतील प्रमुख मान्यवरांसह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी भाले ग्रामपंचायत अंतर्गत बल्क ड्रग पार्क विरोधी संघर्ष समितीचे अध्यक्ष बाबुशेठ खानविलकर यांच्यासह नागरिक उपस्थित होते.

# माथेरानच्या हेरिटेज मिनी ट्रेनला मिळणार हरित ऊर्जेची साथ!

### ट्रेनला पर्यावरणपूरक हायड्रोजन इंजिन जोडण्याची तयारी

◆ **नेरळ (वार्ताहर) :**



ब्रिटिशकालापासून सह्याद्रीच्या निसर्गरम्य कुशीत नागमोडी वळणांवरून धावणारी जगप्रसिद्ध माथेरानची हेरिटेज मिनी ट्रेन आता हरित तंत्रज्ञानाच्या नव्या पर्वात प्रवेश करण्याच्या तयारीत आहे. हेरिटेज दर्जा लाभलेल्या या ऐतिहासिक रेल्वेला पर्यावरणपूरक हायड्रोजन इंजिनाची जोड देण्याची प्रक्रिया सुरू असून, त्यामुळे माथेरानच्या पर्यटनासह पर्यावरण संवर्धनालाही मोठी चालना मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

भारतीय रेल्वेने हेरिटेज रेल्वे मार्गांचे ऐतिहासिक स्वरूप अबाधित ठेवत त्यांना आधुनिक आणि प्रदूषणमुक्त तंत्रज्ञानाची जोड देण्यासाठी हायड्रोजन फॉर हेरिटेज ही महत्त्वाकांक्षी योजना जाहीर केली आहे. केंद्रीय अर्थसंकल्प २०२३-२४ मध्ये या योजनेची घोषणा करण्यात आली होती. या योजनेत देशातील निवडक हेरिटेज रेल्वे मार्गांसह नेरळ-माथेरान हिल रेल्वेचाही समावेश केला आहे. सध्या नेरळ-माथेरान मिनीट्रेन डिझेल इंजिनावर धावते. भविष्यात हायड्रोजनवर चालणारे इंजिन कार्यान्वित झाल्यास धूर आणि कार्बन उत्सर्जनात मोठी घट होणार आहे.

पर्यावरणदृष्ट्या अतिसंवेदनशील असलेल्या माथेरानसाठी हा बदल अत्यंत महत्त्वाचा मानला जात असून, स्वच्छ ऊर्जा व शाश्वत पर्यटनाच्या दिशेने तो एक महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे. यामुळे पर्यावरण संरक्षण आणि शाश्वत विकासाचे माथेरानचे ध्येय अधिक बळकट होण्यास मदत होणार आहे.

सह्याद्रीच्या हिरव्यागार दऱ्या, घनदाट जंगल आणि नागमोडी वळणांमधून धावणारी जगप्रसिद्ध नेरळ-माथेरान हेरिटेज मिनी ट्रेन; लवकरच या ऐतिहासिक रेल्वेला पर्यावरणपूरक हायड्रोजन इंजिनाची जोड मिळण्याची शक्यता असून, हरित पर्यटन आणि स्वच्छ ऊर्जेच्या दिशेने हे ऐतिहासिक पाऊल मानले जात आहे.